नवशक्ति
मुंबई, शनिवार, ४ एप्रिल २०१५



# 'रिॲलिटी बाईट्स- द रोल ऑफ एचआर इन टूडेज वर्ल्ड' पुस्तक प्रकाशित

मुंबई - एचआर प्रोफेशनल्सकरिता अतिशय उपयुक्त ठरणारे 'रिॲलिटी बाईट्स- द रोल ऑफ एचआर इन टूडेज वर्ल्ड' पुस्तक प्रकाशित नुकतेच प्रकाशित झाले. या पुस्तकाच्या लेखिका अपर्णा शर्मा ह्या आघाडीच्या एचआर प्रोफेशनल आहेत. विश्वकर्मा पब्लिकेशन्सने बांद्रा येथील टीएससीएफएम ऑडिटोरीयममध्ये झालेल्या कार्यक्रमामध्ये प्रमुख पाहुणे टाटा-एसआयए एअरलाईन्सचे अध्यक्ष प्रसाद मेनन यांच्या हस्ते या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी एक्स्सर सर्विसेस इंडिया लि.च्या एचआर विभागाचे समूहाध्यक्ष डॉ. आदिल मालिया, आरआयएलचे अध्यक्ष आणि ग्रुप सीएचआरओ प्रबिर झा आणि अनेक मान्यवर मंडळी उपस्थित होती. या १९२पानी पुस्तकाची किंमत २०० रूपये असून ते भारतभरातील बुक स्टोअर्समध्ये तसेच फ्लिपकार्ट आणि विश्वकर्मा पब्लिकेशन्सच्या ऑनलाईन बुक स्टोअरवर उपलब्ध असेल.